# बिहारी मजुराच्या मदतीला आले शिवसैनिक धावून

**संभाजीनगर ( ता.१८ ) :** बिहारी मजुराच्या दुखद निधनात शिवसैनिक आले धाऊन गंगापुर वैजापुर रोड वर बिहार येथील आरा जिल्ह्यातील लठान येथील नरेंद्रराम सुकलालराम प्रसाद वय ४८ हे मजूरी काम करीत होते त्यांचे काल दिनांक १७ ला ह्रदय विकारने निधन झाले ही घटना उपतालुका प्रमुख संजय मोटे यांना कळाली, यावेळी त्यांनी या घटनेची माहिती शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांना फोनवरुन दिली. लगेच खासदार चंद्रकांत खैरे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना सहकार्य करण्याचे आदेश दिले. व घाटीचे अब्यगत कमिटी सदस्य नारायण कानकाटे यांना ही सूचना देऊन पोस्टमार्टम करण्यास सांगितले. स्वीय सहाय्यक सुधीर भाले यांना ही सूचना दिली. त्या नुसार त्यांनी Drm, Dcm यांचेशी संपर्क करुण उद्या दिनांक १९ रोजी पूर्णा पटना गाडीने यांचे शव बिहारकडे रवाना करण्यात येईल. यावेळी युवासेना जिल्हायुवाधिकारी तथा नगरसेवक ऋषिकेश खैरे यांचे सहकार्य लाभले व सर्व शिवसैनिकांनी मोलाचे सहकार्य लाभले.

यावेळी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांचे स्विय सहायक सुधीर भाले, अभ्यागत समिती नारायण कानकाटे, संजय मोटे, राजू ॲम्बलेन्स, रेल्वेचे जाखडे, मोहन, सत्येंद्र सिंह यांनी मोलाचे सहकार्य केले.